शेतकऱ्यांशी मैत्रीपुर्ण संवाद...!

९ व्या वर्षात पदार्पण

कृषीसेवेची ८ वर्षे

शेतकऱ्यांशी मैत्रीपूर्ण संवाद...!

# शेतीमित्र ®

अंक : सहावा | किंमत :₹ ३० | विज्ञान युगाचा





## कडधान्य विशेषांक















SUMEET
TECHNOLOGIES

सुमित टेक्नोलॉजीस् चे

ऊस रोपवाटीकांसाठी क्रांतीकारी संशोधन

" ऊस डोळे काढणी यंत्र "

सादर आहेत, उच्च दर्जाची नवीन यंत्रे








ऑफीसः फ्लॅट नं: 3, पियुष विला, सर्वे नं: 73, कात्रज डेरी मागे, राजाराम गॅस समोर, कात्रज, पुणे - महाराष्ट्र 411046. संजय पाटील | + 91 90 96 77 19 42 | sumeet.technologies@gmail.com



# श्रद्धांजली



बार्शी येथे एका कार्यक्रमात भवरलाल जैन यांच्या हस्ते शेतीमित्र मासिकाच्या ऊस विशेषांकाचे प्रकाशन करताना सोबत संपादक प्रमोद पाटील, सार्थक पाटील

# ठिबक सिंचन प्रणालिचे प्रणिते : भवरलाल जैन

**जागतीक ठिबक सिंचन उद्योगात आपल्या नावाचा जबरदस्त ठसा उमठवणारे जैन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष पाण्याच्या थेंबा-थेंबाचे महत्व पटवून देवून भारतामधील ठिबक सिंचन प्रणालिचे प्रणेते भवरलाल जैन यांचे २५ फेब्रुवारी रोजी निधन झाले. महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी दिलेले विविध स्तरावरील योगदान नक्कीच गेल्या वीस वर्षातील शेतीसुधारणेचा भागा आहे; असे म्हणावे लागेल.**

जळगाव येथील जैन उद्योग समूहाचे संस्थापक-अध्यक्ष भवरलाल हिरालाल जैन यांचे २५ फेब्रुवारी रोजी मुंबईत निधन झाले. पाण्याच्या थेंबा-थेंबाचे महत्त्व पटवून देणाऱ्या भवरलाल जैन यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर शेती, सिंचन आणि अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्रात केलेले लक्षवेधी कार्य नवउद्योजकांना दिशादर्शी ठरणारे आहे. त्यांनी दूरदृष्टी ठेवून केलेल्या यशस्वी वाटचालीमुळे जैन उद्योग समुहाची व्याप्ती केवळ देशापूरती मर्यादित राहिली नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहली. भारतातील परंपारिक शेतीला नवा आया' देण्यासाठी त्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधा-बांधापर्यंत पोहचविले.

जळगाव जिल्ह्यातील वाकोद या छोट्याशा गावात १२ डिसेंबर १९३७ साली त्यांचा शेतकरी कुटुंबात जन्म झाला. जळगाव येथील आर. आर. हायस्कूलमध्ये त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण झाले. तर त्यांनी मुंबई विद्यापीठात बी. कॉम., एलएल.बी. ही पदवी त्यांनी मिळविली. जन्म शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे लहानपणापासूनच त्यांनी शेतीची गोडी होती. त्यामुळे शेती आणि शेतकरी यांच्याबद्दल एक अपुलकीचा जिव्हाळा त्यांना होता. त्यामुळे शेतीक्षेत्रात काम करायचे ठरवूनच त्यांनी पीव्हीसी व एचडीपीई पाइप्स, तुषार व ठिबक सिंचन, पीव्हीसी शीट्स, उतिसंवर्धित केळी व डाळिंबाची रोपांची निर्मिती, सौर कृषीपंप, कांदा निर्जलीकरण, आंबा पल्प, बनाना ज्यूस निर्मिती आदी प्रकल्पाची सुरूवात केली. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतीमलाचे मुल्यवर्धन करण्यासाठी प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी पिकविलेल्या कच्च्या मालाला चांगले दर मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

१९६३ ते १९७८ या काळात त्यांनी खते, बी-बियाणे, जंतुनाशके, ट्रॅक्टर्स आणि सिंचनासाठी लागणाऱ्या पंपासाठी लागणारं हलकं डिझेल, तेलवितरणाचे काम केले. (पान ११ वर)

(पान ७ वरुन) १९७८ मध्ये त्यांनी महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यांमधील सु'ारे २५०० च्यावर शेतकऱ्यांना करारतत्वावर पपईची शेती करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. पपईच्या दुधावर प्रक्रियाकरून त्यांनी 'पपेन' नावाचं एन्झाइ' तयार केले. पुढे २००२ पर्यंत 'पपेन'ची सातत्याने १०० टक्के निर्यात केली.

१९८० मध्ये शेतीसिंचनासाठी त्यांनी पीव्हीसीचे पाइप्स बनविण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी स्वत:ची विपणन शैली अवलंबिली. महाराष्ट्राच्या अगदी तळागाळापर्यंत आणि आजूबाजूच्या राज्यांमध्ये जिल्हास्तरावर त्यांनी वितरक नेमले. पहिल्या दिवसापासूनच कमीत कमी नफा व जास्तीत जास्त उलाढाल हे तत्व होते.

पुढे १९८८ मध्ये त्यांनी ठिबक सिंचन निर्मितीस प्रारंभ केला. अगदी त्यांनी ठिबक सिंचन यंत्रणेच्या विक्रीबरोबरच शेतकऱ्यांना विक्रीपूर्व तसेच विक्रीपश्चात सेवाही पुरविण्याचा त्यांनी विडा उचलला. त्यामुळे १९८८ मध्ये जेमतेम ६०० हेक्टर्स असलेलं ठिबक सिंचनाखालचे क्षेत्र २००८ मध्ये ९ लाख हेक्टर्सवर पोहचले. सध्यस्थितीला या उद्योगाची वाढ दरवर्षी सुमारे १ ते १.२ लाख हेक्टर्स या प्रमाणात होत आहे.

ठिबक सिंचनाबरोबरच त्यांनी शेतीमधील जैवतंत्रज्ञान क्षेत्रात लक्ष घालून केळी आणि डाळिंब रोपांची ऊतिसंवर्धन प्रयोगशाळा उभारली. त्यामुळे केळी उत्पादनाचा कालावधी १८ महिन्यावरून ११ महिन्यावर आला तर केळीच्या घडाचे वजन जवळजवळ २३ किलोपर्यंत गेले. ऊतिसंवर्धित केळी रोपांची जी-९ ही नवी जात व्यापारी तत्त्वावर वितरीत करण्याचा पहिला मान त्यांच्याकडे जातो. त्याचबरोबर त्यांनी युरोपांमधील तसेच अमेरिकेमधील बाजारपेठांमध्ये ताजी पिकली केळी निर्यात करण्याचं त्यांचं स्वप्नंही साकार केले आहे. भविष्यात कांदा आणि त्यानंतर काही औषधी वनस्पती आणि जैव-इंधनदायी वनस्पतीवर आणि त्यांच्या सुक्ष्म गुणित पुनरूत्पादन पद्धतीविषयी संशोधन त्यांनी चालू ठेवले आहे.

जैन उच्च-तंत्र शेती संस्थान ही शेतीसंस्कृतीला अत्यंत अनमोल ठरणारी आणखी एक संस्था त्यांनी स्थापन केली असून, त्यामध्यमातून शेतमालावर संशोधन विकास व प्रात्यक्षिके, प्रशिक्षण आणि विस्तार केंद्र, पडिक जमिनीचा विकास, नापिक जमीन लागवडीखाली आणणे, मृदसंधारण, डोंगराळ व खडकाळ जमिनीवर लागवड करणे, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करणे, जलसंधारणाचे व्यवस्थापन, खतपाणी, हरितगृहे व त्याचबरोबर सेंद्रीय आणि जैव खते, तसेच जैव किटकनाशके हे सर्व एका छत्राखाली केले जाते. तसेच भाज्यांचे निर्जलीकरण आणि फळ प्रक्रिया कारखानेही मोठी गुंतवणूक करून त्यांनी उभारले आहेत.

त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना अनेक राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. भारत सरकारचा पद्मश्री, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची डॉक्टर ऑफ लेटर्स, कोकण कृषी विद्यापीठ आणि उदयपूरच्या महाराणा प्रताप शेती व तंत्रज्ञान विश्वविद्यालया तर्फे डॉक्टर ऑफ सायन्स, तामिळनाडू कृषी विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ सायन्स, आयआयआयईडे सन्माननीय सदस्यत्व, फाय फाउंडेशनचा पुरस्कार, जमनालाल बजाज उचित व्यवहार पुरस्कार, उद्योग विभूषण आणि गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार, सामाजिक कार्याबद्दल जैन समाजातर्फे समाजरत्न, युरेस्को व वॉटर डायजेस्टतर्फे भारताचा जलरक्षकसहित असे सुमारे २६ पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

बार्शी (सोलापूर) येथील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या स्मृती संग्रहालयाच्या लोकार्पण सोहळ्याला ते आले असता त्यांनी बार्शीतून प्रसिद्ध होणाऱ्या आमच्या 'शेतीमित्र' मासिकाची अपुलकीने चौकशी केली होती. शिवाय मासिकाच्या वाटचालीबद्दल चर्चाही करून काही सल्लेही दिले होते. अशा या शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या कृषीउद्योजकाला शेतीमित्र परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली...!

जैन® ठिबक
पाणी थेंबानं... पीक जोमानं!

टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कोबी, ढोबळी मिरची, पपई, आंबा, सिताफळ, चिंच, जांभूळ, अंजीर, आवळा, चिकू, डाळींब इ. खात्रीशीर व दर्जेदार रोपे मिळतील

।। श्री ज्योर्तिलिंग प्रसन्न ।।
शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र असलेली
प्रोप्रा. रविकांत नामदेव जाधव
मो. ९८६०१४१४८५, ९९२२५२२८७७
९६६५९७६५४४
कल्पतरु नर्सरी
पालखी मार्ग, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर (शेटफळ-पंढरपूर रोडवर)